



# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ५२ वा ❑ भारतीय सौर दिनांक १२ चैत्र शके १९४८, गुरूवार दि.०२ एप्रिल २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### माणुसकीचा बाजार भरलाय, पण मदतीचा हात मात्र हरवलाय...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

जेव्हा समाज समोर घडणारा अन्याय पाहूनही गप्प बसतो, तेव्हा ती समाजाची वैचारिक आणि नैतिक हतबलता असते.याला काय म्हणावे? जेव्हा डोळ्यादेखत गुन्हा घडत असताना फक्त बघत राहणाऱ्या लोकांसाठी कोणता शब्द वापरावा,असा प्रश्न जेव्हा पडतो तेव्हा अशा समाजाचा उल्लेख मूक प्रेक्षक किंवा सामाजिक नापुसकता म्हणून करता येईल. माणुसकीचा बाजार भरलाय, पण मदतीचा हात मात्र हरवलाय असे खेदाने म्हणावे लागते

भर रस्त्यात एखाद्या तरुणीची,किंवा लहान अल्पवयीन मुलीवर अत्याचार होत असताना नुसते बघते, व त्या दृश्याचे चित्रण करणाऱ्या गिधाडांना काय म्हणावे तर यांना षंड ,नपुसंक म्हटले पाहिजे

अशा कितीतरी घटना आजूबाजूला घडत असताना काही लोक विरोध न करता आपल्या मोबाईल मध्ये चित्रण करतात आणि मोठ्या हौसीने फॉरवर्ड करतात. असाच प्रकार बिहार मध्ये नुकताच घडला.

वीस वर्षीय तरुणीला काही जणांनी घेरुन भर रस्त्यात तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. तरुणीच्या अंगावरील कपडे फाडण्यात आली. तरुणी किंचाळत असताना तिच्या मदतीला कोणीच धावले नाही मात्र, घटनेचा व्हिडीओ चित्रित करुन समाज माध्यमांवर व्हायरल करण्यात आला. बिहारच्या नालंदामध्ये घडलेल्या या घटनेमुळे सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे.

एवढेच नव्हे तर या नपुसकांनी तरुणीला घेरुन कपडे फाडले

समोर आलेल्या माहितीनुसार, नालंदा जिल्ह्यातील नूरसराई परिसरात २६ मार्च रोजी रात्री ६ ते ७ च्या दरम्यान ही घटना घडली. पीडित वीस वर्षीय तरुणी बाजारातून माघारी घरी जात असताना तिच्याच गावातील तिघांनी तिचा रस्ता रोखला. दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार, ''संशयितांनी तरुणीला घेरुन रस्त्यात ओढले आणि तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. तरुणीने प्रतिकार केला तरीही संशयितांनी तिचे कपडे फाडून अर्धनग्न केले.''

मदत न करता काढला व्हिडीओ

संशयित तरुणीला घेरुन तिच्यावर अत्याचारासाठी जबरदस्ती करत असताना परिसरात असणारे स्थानिक तिच्या मदतीलाही धावले नाहीत. दरम्यान, संशयितांनी या घटनेचा व्हिडीओ चित्रित करुन तो समाज माध्यमांवर व्हायरल केला. या घटनेची ४० सेकंदाची एक व्हिडीओ क्लिप सर्वत्र व्हायरल होऊ लागली आहे. बघ्यांनी मदत न करता व्हिडीओ काढण्याला प्राधान्य दिले.

तरुणीची इभ्रत वाचवण्या ऐवजी त्या जमावातील लोकांनी व्हिडिओ काढण्याला जास्त प्राधान्य दिले. संवेदनशीलता पूर्णपणे संपलेल्या समाजाचे हे लक्षण आहे. लोकशाहीचा किंवा सभ्य समाजाचा लज्जास्पद अध्याय असेच या घटनेचे वर्णन करता येईल.ही केवळ त्या व्यक्तीवरची वेळ नसून संपूर्ण व्यवस्थेसाठी शरमेची गोष्ट आहे.थोडक्यात सांगायचे तर, ''माणुसकीचा बाजार भरलाय, पण मदतीचा हात मात्र हरवलाय.''असेच म्हणता येईल.






# ५० वर्षानंतर पुन्हा मानव चंद्राच्या सफरीला

## नासा अरटेमिस मोहिमेसाठी ८० टक्के हवामान अनुकूल

ज्योतिर्मय साहित्य

फ्लोरिडा : नासा अरटेमिस २ मून मिशन : ५० वर्षांनंतर पहिल्यांदाच मानव चंद्राच्या जवळ जाणार आहे. नासा अरटेमिस ही मोहीम चंद्राला वळसा घालून पुन्हा पृथ्वीवर परतेल. नासाच्या चंद्राच्या सफरीला आता निसर्गाने देखील साथ दिली आहे. केंनेडी स्पेस सेंटर (फ्लोरिडा ) येथून होणाऱ्या नासा अरटेमिस प्रक्षेपणासाठी हवामान अनुकूल राहण्याची ८० टक्के शक्यता, असे 'टाईम्स ऑफ इंडिया' च्या एका वृत्तात म्हटले आहे.

अरटेमिस प्रक्षेपणाची टाइमलाईन

प्रक्षेपणाची तारीख: बुधवार, १ एप्रिल २०२६

प्रक्षेपणाची वेळ (): संध्याकाळी ६:२४ वाजेपासून २ तासांची लाँच विंडो खुली होईल

भारतीय वेळ (): गुरुवार, २ एप्रिल २०२६, पहाटे ३:५४ वाजता.

प्रक्षेपण स्थळ: केनेडी स्पेस सेंटर, फ्लोरिडा (लाँच कॉम्प्लेक्स ३९)

या मोहिमेसाठी 'अनुकूल हवामान' हे एक सकारात्मक चिन्ह आहे कारण रॉकेटच्या प्रक्षेपणात हवामानाची खूप महत्त्वपूर्ण भूमिका असते. हवामानातील कोणत्याही छोट्या बदलामुळे रॉकेटच्या प्रक्षेपणास विलंब होऊ शकतो.

अरटेमिस प्रक्षेपणासाठी हवामान अनुकूल

नासा अरटेमिस चे प्रक्षेपण ८० टक्के '''' असे आहे, हे दर्शविते की परिस्थिती सामान्यत: प्रक्षेपणासाठी अनुकूल आहे. ८० टक्के हे संभाव्यतेचे संकेत आहे की वाऱ्याचा वेग, ढगांची जाडी आणि पर्जन्यवृष्टीसह हवामानाची परिस्थिती प्रक्षेपणासाठी कठोर सुरक्षा आवश्यकतांमध्ये असेल. हाय '''' टक्केवारी नेहमीच एक स्वागतार्ह चिन्ह असते, विशेषत: अशा महत्त्वपूर्ण प्रक्षेपणासाठी. हे लक्षात घेण्यासारखे आहे की प्रक्षेपण पूर्णपणे निश्चित नाही, कारण हवामान नेहमीच अप्रत्याशित असते आणि हवामानात अगदी थोडासा बदल देखील प्रक्षेपण पुढे ढकलले जाऊ शकते.

यु एस स्पेस फोर्स आणि नासाचे हवामानशास्त्रज्ञ परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत, विशेषत: ढग तयार होणे आणि वाऱ्याच्या संदर्भात, जे प्रक्षेपण विलंबाचे मुख्य कारण आहेत.

अंतराळ प्रक्षेपणासाठी हवामान का गंभीर?

अंतराळ मोहिमेमध्ये विचार केला जाणारा हवामान हा सर्वात महत्वाचा घटक आहे. नासाच्या सारख्या रॉकेटला विविध वातावरणीय थरांमधून प्रवास करावा लागतो, ज्यामुळे ते हवामानाच्या परिस्थितीस बळी पडतात. उदाहरणार्थ, ढग तयार होणे घ्या, जे ट्रॅकिंग सिस्टममध्ये व्यत्यय आणू शकते आणि वीज पडल्यास धोका ठरू





शकतो. जोरदार वारे देखील असू शकतात, विशेषत: उच्च उंचीवर, चढाई दरम्यान रॉकेटच्या स्थिरतेवर परिणाम करतात.

नासाच्या अलीकडील अपडेटनुसारनुसार, ढग तयार होणे आणि संभाव्य जोरदार वारे हे अरटेमिस मोहिमेशी संबंधित दोन मुद्दे आहेत. शिवाय, आर्टेमिसनुसार विविध नियम हवामानाचे निकष, जसे की ''थिक क्लाऊड रूल '' सुरक्षित मिशन सुनिश्चित करण्यासाठी त्याचे पालन करणे आवश्यक आहे. जेव्हा ढगांमधील विद्युत प्रभारांमुळे वीज पडण्याची शक्यता असते तेव्हा असे नियम मिशन सुरू होण्यापासून रोखतात.

५० वर्षांहून अधिक काळातील चंद्राभोवती पहिली क्रू ट्रिप :

अरटेमिस मिशन ही ५० वर्षांहून अधिक काळातील चंद्राभोवती पहिली क्रू ट्रिप आहे, ज्यामुळे अंतराळ संशोधनातील ही एक ऐतिहासिक घटना बनली आहे. या मोहिमेमध्ये चार अंतराळवीर असतील ज्यांना अंतराळात पाठवले जाईल.

या मोहिमेतील ४ अंतराळवीर कोण आहेत?

१.रेईड वीसमन – कमांडर, २. विक्टर ग्लोव्हर – पायलट, ३.ख्रिस्तीना कोच – मिशन स्पेशालिस्ट

जेमी हनसेन – मिशन स्पेशालिस्ट (कॅनडा)

१० दिवसांच्या प्रवास :

ओरियन अंतराळ यान. हे पथक १० दिवसांच्या प्रवासावर जाईल आणि परिणामांचा उपयोग चंद्र आणि इतर भागातील भविष्यातील मोहिमांमध्ये वापरल्या जाणाऱ्या महत्त्वपूर्ण प्रणालींची चाचणी घेण्यासाठी केला जाईल. हवामान चांगले असल्याचा अंदाज वर्तविला गेला आहे ही वस्तुस्थिती केवळ या ऐतिहासिक घटनेच्या उत्साहात भर घालते.

नासाचे तज्ज्ञ हवामानावर लक्ष ठेवतील :

प्रक्षेपणासाठी हवामान अनुकूल असल्याचे दिसत असले तरी, नासाचे तज्ज्ञ प्रक्षेपणाची वेळ येईपर्यंत हवामानावर लक्ष ठेवतील. प्रक्षेपणासाठी विंडो आधीच सेट केली गेली आहे आणि हवामानात कोणत्याही बदलांमुळे काही तास किंवा दिवस विलंब होऊ शकतो. तज्ञांनी नमूद केले आहे की या प्रकरणात लवचिकता आवश्यक आहे, सुरक्षितता ही मुख्य प्राथमिकता असावी ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन.

ही मोहीम खरोखरच प्रगतीचे प्रतीक :

हवामानाचा अंदाज अनुकूल हवामानाची ८० टक्के शक्यता दर्शवितो ही वस्तुस्थिती केवळ एक प्लस असू शकते. ढगांचे आच्छादन आणि वारा यासारखी आव्हाने निरीक्षणाखाली असली तरी हवामान या मोहिमेसाठी मोठ्या प्रमाणात अनुकूल आहे. मानवजात अवकाशात परत येण्याच्या तयारीत असताना, ही मोहीम खरोखरच प्रगतीचे प्रतीक आहे आणि हवामान नासाच्या बाजूने काम करत आहे.

(महाराष्ट्र टाइम्स च्या सौजन्याने)

**

# भेटींत रुष्टता मोठी........

ज्योतिर्मय साहित्य

पुण्याचे उत्कर्ष प्रकाशनचे प्रमुख आणि ज्यांच्या उत्कर्ष प्रकाशन संस्थेत पुण्यातील डेक्कनवर साहित्यिकांचा अड्डा व्यंकटेश माडगूळकर, रविंद्र पिंगे, शांता शेळके यांच्यापासून अजुनही सुधीर गाडगीळ, श्याम भुर्के आणि इतरांचा आहे ते सु वा जोशी मागच्या महिन्यात ११ फेब्रुवारीला अत्यानंदाने त्यांच्या नातवाची त्याच दिवशी झालेली भेट मला आनंदाने सांगत होते. ते मला म्हणालेमाझा नातू अर्णव आज कॅनडाहून माझ्यासमोर अचानक येऊन उभा राहिला आणि मी स्वप्नात आहे का? असा मला मीच चिमटा घेऊन त्याला मिठीत घेऊन आनंदाश्रुने भेटलो. आजोबांना अचानक न सांगता येऊन त्यांच्यासमोर उभे राहून त्यांना आनंद देणाऱ्या अर्णव या नातवाचे त्यांच्याबरोबर असणारे बाँडिंग मला प्रचंड भावले आणि आनंद देणारे ठरले.




अर्णव यायच्या आधीच जेव्हा त्याचे पुण्यात येण्याचे विमानाचे तिकीट बुक झालं तेव्हापासूनच त्याने त्याची आई नीलिमा जोशी-वाडेकर आणि इतरांना सांगून ठेवलं होतं की मी येतोय तर आजी-आजोबांना मी येणार आहे ते सांगू नका. मला त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद बघायचाय. सु वा जोशी यांना तीन मुली. तिन्हीपण परदेशात आहेत. त्यांची मोठी मुलगी नीलिमा आणि जावई रिटायर आयुष्य सु वा जोशी यांच्या प्रेमळ आग्रहामुळे पुण्यात स्थायिक होऊन उत्कर्ष प्रकाशनचा थोडाफार व्याप सांभाळत आहेत. नीलिमा लहानपणापासूनच शाळा आणि उत्कर्ष बुक शॉप बघत आली आहे. शांता शेळके आणि इतर साहित्यिकांचा सहवास तिला लाभला आहे. त्या काळात घरोघरी जाऊन नीलिमाने दिवाळी अंक तसेच ग्रंथ विकलेले आहेत. अजूनही तिला त्या वेळी ग्रंथ विकून मिळणारा आनंद आठवतोय. पुन्हा नीलिमा तिच्या आयुष्याचा पन्नाशीनंतरचा कार्यकाळ ग्रंथ प्रकाशन आणि ग्रंथ विक्रीच्या आनंदात रममाण झालीय.




सु वा जोशी मला सांगत होते. आमचे अर्णव हे पहिलेच नातवंड असल्यामुळे त्याचे लाड पण खूप झाले. तसेच आजोबा आणि नातवाचे एक बॉण्डिंग पण वेगळे आहे. आजोबा नेहमी त्याच्या दंग्यामध्ये सहभागी व्हायचे. तसाच अर्णव पण दंगेखोर होता. लहानपणी त्यामुळे त्याला आजोबा बरोबर खूप मजा यायची. आजोबांची गाडीचा झोपलेला असला तरी त्याचा आवाज ऐकला कि तो जागा व्हायचा आणि आजोबांना सांगायचा अर्णवला आता आजोबा मोठी चक्कर मारून आणणार आहेत. अगदी लहान होता तेव्हा आजोबा अणु येतोय म्हणजे चुकून त्यांना कळलं नाही ते खाली आहेत तर त्यांना कळावं की कोण बोलतंय असं थांबून तो त्यांच्याबरोबर दुकानात जायला नेहमी बघायचा.

भारतात अर्णव कॅनडा येथून येताना त्याला त्याचे आईवडील सांगत होते की, तुझं सगळं तिकडे व्हिसाच्या पुर्ततेचे होऊ देत. घाई करू नकोस, सावकाश ये. पण अर्णवला आजी-आजोबांना भेटण्याची घाई होती. व्हिसा मिळाल्यानंतर काम झाल्या झाल्या अर्णवने विमानाचे तिकीट काढलं आणि तो १० फ ेब्रुवारीला मुंबईला लँड झाला. पुण्याला पहाटे चार वाजता पोहोचला. आजोबांचं रूटिंग अर्णवला माहीत असल्याने व ११ फेब्रुवारीला नेमका बुधवार हा उत्कर्ष प्रकाशनाचा सुट्टीचा वार असल्याने जेवण झाल्यानंतर तिकडे आजोबांच्या घरी त्यांच्यासमोर जाऊन तो उभा राहिला. आणि आजोबांचा जो आनंद होता तो सर्व अर्णव आणि त्याच्या आई-वडिलांना बघायला मजा वाटली.

लहानपणापासूनच अर्णवला खूप सर्व गोष्टींचीच चिकित्सा असायची. त्यामुळे सर्व करून बघायचं असायच. एकदा लहानपणी त्याला श्लोक शिकवताना म्हणजे साधारण तो अडीच वर्षाचा असेल त्याला त्याच्या आईने कुमोनला टाकलं होतं. कुमोन म्हणजे इंग्लिश-मॅथ्स याचे क्लासेस. त्याला सिंगापूरच्या महाराष्ट्र मंडळात गणपती स्तोत्र म्हणायचं होतं ते त्याच्याकडून त्याच्या आईला पाठ करून घ्यायचं होतं. त्यामुळे कधी वेळ मिळेल तेव्हा त्याला त्याची आई त्याच्याकडून श्लोक पाठांतर करून घ्यायची. पण कुठेतरी अर्णवला एक उत्सुकता होती की समजा मी हे श्लोक सगळे पाठ केले तर वरती फ्लाईट मध्ये गेल्यानंतर काही प्रॉब्लेम आला तर मी श्लोक म्हटला तर नॉर्मल होईल का? तेव्हा त्याला पायलेट व्हायची खूप इच्छा होती. **(क्रमशः)**







# जात्यावरच्या ओव्या......

नही माती हुन मोठ
माणसाच मोठेपण
तिच्या पोटात दाटले
सोन्या-पाण्याचे रांजण ||५७२||

खर अन् खोट
लागलेत भांडू
खोट्याचा बोलबाला
खर्याला येत रडू ||५७३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग १३




ज्योतिर्मय साहित्य

या रामायण महाभारतातील उदाहरणाव्यतिरिक्त इतिहासात आणि वर्तमानात देखील वाईट वासना मनात ठेवून वागल्यामुळे व्यक्तीच्या आयुष्याचा विनाश झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. अनेक राजे आणि राज्यांचा नाश झाला आहे. अनितीने वागल्यामुळेच अनेक व्यक्तींनी स्वतःचा विनाश ओढवून घेतला आहे. काळ हा सर्वशक्तिमान आहे. त्याची सर्वांवर सत्ता चालते. जन्मलेल्या व्यक्तीला मृत्यू निश्चित असतो परंतु तो केव्हा येईल हे सांगता येत नाही. म्हणून वेळीच सावध होणे गरजेचे.
तीच जाणीव आपल्याला समर्थ या ठिकाणी करून देतात. ‘‘ पापाची वासना नको दावू डोळा ‘‘असे संत तुकाराम महाराज देखील आपल्याला सांगतात ते यामुळेच.



महाभारतात यक्ष आणि युधिष्ठिर यांचा एक संवाद याबाबतीत अतिशय समर्पक असा आहे. ‘‘ या जगातील सगळ्यात मोठे आश्चर्य कोणते ?‘‘असा प्रश्न यक्ष युधिष्ठिराला विचारतो. त्यावर युधिष्ठिराने दिलेले उत्तर मोठे छान आहे. तो म्हणतो, ‘‘ जन्मलेल्याला मृत्यू निश्चित आहे परंतु तरीही त्याचे भान व्यक्तीला नसते. आपण अमर आहोत असेच सगळे वागत असतात. हेच या जगातील सगळ्यात मोठे आश्चर्य आहे.‘‘

या सगळ्या इतिहासातील उदाहरणांवरून आपण काहीतरी बोध घ्यायचा असतो. इतिहास हा केवळ वाचण्यासाठी नव्हे तर त्यापासून शिकण्यासाठी असतो. पुढच्या ठेच मागचा शहाणा असे आपण म्हणतो ते याच अर्थाने ! आपले आयुष्य मर्यादित असते.
म्हणून मृत्यूचे भान ठेवून प्रत्येकाने वाईट वासनांचा त्याग केला पाहिजे आणि आपल्या आयुष्यात सत्कर्मांना स्थान दिले पाहिजे असेच समर्थांचे सांगणे आहे. आणि हे जेवढ्या लवकर लक्षात येईल तेवढे चांगले !

स्वसंवाद : माझ्या मनात अजूनही कोणत्या वाईट वासनांचे बीज दडलेले आहे का?


रावण किंवा दुर्योधन यांच्या कथांमधून मी खरोखर काही बोध घेतो का?


सत्ता, अहंकार किंवा मोह यामुळे माझ्या विवेकावर पडदा तर पडत नाही ना?

जीवन क्षणभंगुर आहे ही जाणीव ठेवून मी माझा वर्तमान अधिक सजगपणे जगतो का?

माझ्या आयुष्यात सत्कर्मांची वाढ आणि दुष्प्रवृत्तींचा त्याग करण्यासाठी मी सजग प्रयत्न करतो का?

(क्रमशः)



# दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# देहान्त निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

दशक-७ / समास-१०

नमस्कार

काल प्रभुरामरायांचा जन्मकाल आपण समस्त भारतवासींनी अगदी मनोभावे साजरा केला.

हजारो लाखो वर्षांचा काळ लोटला तरी प्रभु रामचंद्र प्रत्येक भारतीयांच्या मनात अटळ स्थान ठेऊन आहेत.

त्यांच्यावरील श्रध्दा विश्वास एक कणभर देखील कमी झाला नाही. मी तर म्हणेन की पूर्वी पेक्षा रामजन्म मोठ्या धुमधडाक्यात साजरा केला जातो आहे. रामराया, सीतामाई लक्ष्मण मारूती व सर्व परिवार देवता या समस्त भारतीयांच्या मनातील ताईत बनले आहेत. हे सर्व विचार एका दिवसात जनमानसात रूजले नाहीत तर त्यांच्या कथा या माणसांच्या अंत:करणाचा ठाव घेतला आहे.


आपल्या समर्थांची तर प्रभुरामरायावर गाढ श्रध्दा आहे. आपणही त्यांच्या चरणीं नतमस्तक होऊन समासाला सुरुवात करूया.

नेहमी चांगले विचार मनात ठेवावेत. कधीच कुणाला दुखवू नये. कुणाचाही तळतळाट घेऊ नये.

चोरी करू नये. नेहमी चांगले वागावे. कुणाचाही दुस्वास करू नये. कुणाच्या मनाला वाईट वाटेल असे वागु नये. अतिलोभ करू नये. सर्वकाही प्रमाणात असावे.

आपण जे दुसऱ्याला देतो त्याचे परत आपल्याला मिळेल या भावनेने कोणतेही कर्म करू नये. म्हणजेच निःस्वार्थ बुद्धीने कर्म करावे. आपण जे दुसऱ्याला देतो त्याचे परत मिळत नाही. जसे पेरल्यानंतर धान्य उगवते. जे श्रम केलें नाहीत त्याचे मोल जसे मालकाला मागता येत नाही. किंवा कुणाला विनाकारण लुबाडून धनद्रव्य घेऊन मोठे होऊ नये. आपल्या श्रमाचा जो मोबदला मिळतो त्यावर चरितार्थ चालवत जावा. अतिलोभ करू नये. जिवंतपणी जो भगवंताची उपासना करत नाही. त्याला मुक्ति मिळत नाही. **(क्रमशः)**

# नामाचा अनुभव



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

नामाचा अनुभव कोणता ? नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशात पाहू नये; म्हणजे, नामापासून दुसरे काही मिळवायचे आहे ही कल्पनाच नसावी. नाम मुखी येते हाच नामाचा अनुभव. ज्या प्रमाणात आपल्या हातून नामस्मरण घडले त्या प्रमाणात आपल्याला नामाचा अनुभव आला असे समजावे. अखंड नामस्मरण टिकले, की पुरा अनुभव आला. नामस्मरण करता करता चित्त एकाग्र होते. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. मी कोण आहे हे कसे ओळखावे ? ‘ मी कोण आहे ’ हे ओळखायला, जडाने म्हणजे वाचेनेच नाम घेण्यास सुरुवात करावी, आणि ते नाम अखंड घेण्याचा प्रयत्न करावा. मग ते मनाने आतल्याआत होऊ लागते. पहिल्यानेच आपल्या प्रयत्नाने मनाला नामाचे वळण लावण्याच्या नादी लागू नये, कारण ते फारच अवघड आहे. नाम घेता घेता देहाचा विसर पडल्यावर मी कोण आणि देव कोण हे आपोआप कळेल.

भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दु:खाची जाणीव कमी होते. दु:खाची जाणीव नसल्यावर दु:ख असले म्हणून बिघडले कुठे ? काळोख्या रात्री जशी काठी आधार असते, तसे संसारात नाम आहे. खाचखळगे काठीच्या योगाने टाळता येतात, तसे मोह, लोभ इत्यादि संसारातल्या अडचणी नामाने समजतात आणि दूर करता येतात. विस्तवाजवळ तूप ठेवले की ते वितळते, तसे नामाची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव. पण लोक नामाबद्दल ऐकूनच घेत नाहीत; जर कोणी ऐकून घेतले तर ते बिंबवून घेत नाहीत, त्याचे मनन करीत नाहीत; आणि मनन करून ज्यांना ते पटले, ते पटले असूनही नाम घेत नाहीत. अडचणी असल्या तरी नाम घेता येते. म्हणून नामस्मरण न करण्याबद्दल सबबी सांगू नका. सबब सांगितली की त्यापासून लबाडी उत्पन्न होते, लबाडीतून आळस उत्पन्न होतो, आणि आळसाने सर्वनाश होतो. आपण रोज उठल्यावर भगवंताचे स्मरण करण्याचा नियम ठेवावा. स्नान वगैरे गोष्टी झाल्या तर कराव्याच, पण त्यांच्यावाचून अडून बसू नये. भगवंताचे स्मरण हे मुख्य आहे. अखंड नामस्मरण ठेवायला सोवळ्याओवळ्याचे बंधन नाही. अखंड स्मरणच सोवळे आहे.

उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. महत्त्व नामाला आहे. निरनिराळ्या देशांतले अन्न निरनिराळे असू शकते, पण ते पचविण्याकरिता लागणारे पाणी इथून तिथून सर्व सारखेच. पाण्याशिवाय कोणतेही अन्न पचणार नाही. त्याप्रमाणे उपासनारूपी अन्नाला पचविण्यासाठी नामरूपी पाण्याची जरुरी आहे. म्हणून नामाला महत्त्व देऊन ते सतत घेण्याचा अभ्यास करावा. कसाही प्रसंग आला तरी नामस्मरण सोडू नका. त्यातून परमात्मा हात देईल.

नाम घ्यायला स्वतःचीच आडकाठी असते. ती दूर केली तर नामाचा अनुभव आल्यावाचून राहणार नाही.

# श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

**भागवत कथाकार :**
**आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर**
**कथेचे श्रवण करताना धावते संकलन**
**मधुकर बोरीकर 9403061886**

पुढे...
भागवत हे महापुराण आहे म्हणून 10 लक्षणे आहेत सर्ग, मनन, चिंतन, विसर्ग स्थान पोषण, मन्वंतर, निरोध, मुक्ती आश्रय ही ती लक्षणे आहेत
तिसरा स्कंद हा सर्ग (म्हणजे निर्मिती) ही लक्षण घेऊन येतो.
सर्ग हा महत्त्वाचा आहे यात दोन चरित्रे आली आहेत. सर्ग म्हणजे सर्जन. सर्ग म्हणजे भगवंताने घडविलेली सृष्टी तर विसर्ग म्हणजे भगवंतांनी ज्यांना निर्मिले त्यांनी निर्माण केलेली सृष्टी.
सृष्टी 2 प्रकाराची आहे 1. बद्ध, 2. मुक्त.
कर्म सृष्टी ही बध्द तर ज्ञान ही मुक्त सृष्टी आहे
कश्यप व दिती बद्ध., देवहुती व कश्यप मुक्त.
अदितीच्या मनात सायंकाळी काम वासना निर्माण झाली. काम वासना निर्माण व्हावा यासाठी अनेक योजना आहेत.
ऋषीने नदीच्या पाण्यात मत्स्य मैथुन करताना पाहिले व लग्न करायचे ठरविले. ते वृद्ध होते ते राजाकडे गेले व लग्नासाठी त्याचेकडे मुलगी मागितली. राजा, ऋषी वृद्ध असल्याने, विचारात पडले. ऋषीला नाहीही म्हणता येईना. राजा म्हणाला मी मुलगी देतो पण माझ्या 60 मुली पैकी जिला तुम्ही पसंत पडाल ती तुम्हाला देतो. मुलीना राजा घेऊन येईपर्यंत ऋषी योग सामर्थ्याने तरणे बांड झाले. देखणे झाले. राजाच्या 60 ही मुलींनी त्याला वरले. त्याने सर्वांशी लग्न केले.
दीतीला काम बळावला कश्यप ही वेळ सायंकाळची आहे म्हणाले. तरीही दीती ऐकेना. शेवटी तिची इच्छा कश्यपाने तिची इच्छा पूर्ण केली. पुन्हा स्नान करून तपाला बसले. दितीलाही नंतर पश्चाताप झाला. कश्यप म्हणाले तू नियम पाळले नाहीस. अकाली निर्माण झालेला काम तुझा घात करेल तुझ्या पोटी 2 राक्षस जन्म घेतील. माझ्या मनात विचार होता म्हणून याचा अंतिम परिणाम चांगला होईल. भगवंत अवतार घेऊन या राक्षसांचा नि:पात करतील.
हिरण्याक्ष याला संपविण्या साठी त्यांनी वराहाचे रूप घेतले. वराह हा कायम खाली जमिनीकडे पाहतो. वराह अवतार घेऊन त्यांनी त्याचा वध केला.
वराह भगवान की जय. क्रमश:......




# म्हातारपणी गुडघेदुखी या आजाराचे कारण

ज्योतिर्मय साहित्य

गुडघेदुखीवर पुढील प्रंमाणे निसर्ग उपचार करावे :-

१) गुडघ्यावर थोडेसे तिळाचे तेल गरम करून हलक्या हाताने मसाज करावा तिळाच्या तेलात थोडेसे लवंग व ओवा टाकून एकदा उकळून घ्यावे व थंड झाल्यानंतर त्या तेलाने हलक्या हाताने मसाज करावा.

२) रात्री काळी माती भिजत ठेवावी व सकाळी थोडेसे गरम करून गुडघ्यावरती लावून त्यावर कापडी पट्टी बांधावे साधारणतः एक ते दीड तास ठेवावे.

३) गुडघ्याला सूज व वेदना असतील तर थंड गरम शेक करावा.

४) कच्च्या बटाट्याची पेस्ट करून गुडघ्याला त्याचा लेप दिला तर त्याचा गुडघेदुखीवर फायदा दिसून येतो बटाट्याच्या बटाट्यामुळे सांध्यातील सूज कमी होण्यास मदत मिळते.

५) ऑस्टियोआर्थरायटिस मध्येही गुळ , हळद , मेथी दाणे पावडर व तिळाचे तेल याची एकत्र पोटीस बनवून त्याचा लेप गुडघ्यावर साधारणतः ३० ते ४५ मिनिटे ठेवावे याचा लाभ मिळतो .

६) मोहरीची बारीक पावडर करून मोहरीच्या तेलात घालून त्याची पेस्ट गुडघ्यावर बांधावे याचा फायदा मिळतो .

७) गावरान भारतीय देशी गाईचे गोमूत्र लाल रंगाच्या बाटलीत १५ ते २० दिवस बंद बुच करून उन्हात ठेवावे त्या गोमुत्राने गुडघ्याला हलकेसे मसाज केले असता त्याचा लाभ होतो .

८) एक बकेट आपणास सहन होईल तेवढे गरम पाणी करून त्यात एक चमचा मॅग्नेशियम सल्फेट टाका व एक ग्लास पाणी प्यावे व डोक्यावर थंड पाण्याची भिजून टावेल ठेवावे व गरम पाण्यात गुडघ्यापर्यंत दोन्ही पाय बुडवून बसावे साधारणता पंधरा ते वीस मिनिट असे दररोज बसावे याचा गुडघेदुखी मध्ये लाभ होतो.

९) काचेचा एक ग्लास घेऊन त्यात दोन ते तीन चमचे मेथी दाणे रात्री भिजत ठेवावे व सकाळी त्या पाण्यामध्ये दोन लसणाच्या पाकळ्या टाकून थोडेसे कोमट करून अनुशा पोटी सकाळी घेतल्यास याचा फायदा होतो.याचबरोबर काळे किंवा साधे मनुके वीस नग व दोन अंजीर रात्री पाण्यात भिजत ठेवावे व एक तासाच्या फरकाने खावे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

१०) गुडघेदुखी साठी साधारणता ५० ते ६० ग्रॅम मेथी अंकुरित करून नाष्टाच्या वेळी कच्चे खाल्ले तर याचा फायदा होतो .

११) दुपारच्या जेवणात उकडून घेतलेल्या भाज्या भरपूर प्रमाणात व अंकुरित केलेले कडधान्य कोंड्यासहित भाकरी किंवा चपाती खावे थोड्यावेळाने अडीचशे ते तीनशे ग्रॅम पिकलेली पपई आवर्जून खावे याचा बऱ्याच प्रमाणात फायदा होतो .

१२) संध्याकाळी उकडलेल्या भाज्या किंवा कोणती फळे भरपूर प्रमाणात खावे जेणेकरून पचायला सोपे जाईल.
आहारात नियमितपणे दुधी भोपळा, दोडका, पानकोबी, मेथी, शेवगा, बीट, चवळी, राजगिरा, पपई, चिक्कू, जरदाळू, सिताफळ, नाशपती असे कोणतेही हंगामी फळे खावीत गुडघेदुखी असणाऱ्या व्यक्तीने पुढील गोष्टीचा त्याग करावा टमाटे, फ्लावर, मुळा, वटाणा, आंबा, आंबट लोणचे, तेलकट मसालेदार पदार्थ, दारू, बिडी, सिगारेट, शीतपेय, चहा, कॉफी, बेसनचे पदार्थ, मैद्याचे पदार्थ, साखर, रवा, डालडा, याचा शक्यतो वापर करू नये.


**(क्रमशः)**

# आनंदामृत ....

विचारमंथन प्राचीन वाङ्मयाचे...

अपर्णा परांजपे, कात्रज पुणे
मो. 95030 45495





## वेताळ कथा १८ (वेताळ पंचविंशती)

एका नगरात एक न्यायाधीश होता. तो अत्यंत प्रामाणिक आणि न्यायप्रिय होता. एकदा त्याच्यासमोर एक महत्त्वाचा खटला आला.
त्या खटल्यात एक प्रभावशाली व्यक्ती दोषी होती.
सर्व लोक त्या व्यक्तीच्या बाजूने होते.
जर न्यायाधीशाने त्याला दोषी ठरवले, तर त्याच्यावर टीका होणार होती. न्यायाधीशाच्या मनात द्वंद्व निर्माण झाले – लोकमत की सत्य?
काही क्षण तो शांत राहिला. शेवटी त्याने सत्याच्या बाजूने निर्णय दिला.
त्याला टीका सहन करावी लागली, पण त्याने आपल्या अंतर्मनाशी प्रामाणिक राहिले.
वेताळाने विचारले – तो न्यायाधीश महान कशामुळे ठरला?
राजा विक्रम म्हणाला –“जो लोकमताची भीती न बाळगता सत्याचा स्वीकार करतो, तोच महान.”
यातून समजते की मी योग्य गोष्ट निवडते का, जरी ती कठीण असली तरी? की लोक काय म्हणतील यावर निर्णय घेते?
कथेत “नैतिक धैर्य आणि लोकमत” यांचा संघर्ष दिसतो.
१: लोकमत : इतर काय म्हणतील. २: भीती : टीकेची भीती.
३: द्वंद्व : योग्य विरुद्ध सोपे.
४: धैर्य : सत्यासाठी उभे राहणे. ५: नैतिकता : सत्याशी निष्ठा.
थोडक्यात: “सत्यासाठी उभे राहणे हेच खरे धैर्य.”
भगवंत हृदयस्थ आहे 🙏

# प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक से. संस्थेचा पदग्रहण व शपथ विधी समारंभ संपन्न

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक ससेवभावी संस्थेचा पदग्रहण व शपथ विधी समारंभ दिनांक ०१-०४-२०२६ रोजी वि. वि. चिपळूणकर सभागृह, गीता भवन, एन ५, सिडको, छ. संभाजीनगर येथे संपन्न झाला.

प्रमुख पाहुणे प्रसिद्ध उद्योगपती लाईफ लाईन मेडिकल डिव्हायसेसचे संचालक डॉ. विनोद भाले होते. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी श्री. श्रीराम जोशी, मावळते अध्यक्ष श्रीकांत पत्की, नवे अध्यक्ष प्रमोद बेंडे, मावळते सचिव प्रेमचंद तुल्ले, आणि नवनिर्वाचित व्यवस्थापन मंडळातील सर्व सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते. शैलजा देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. विश्वास काळे आणि सुधीर गोसावी यांनी कराओके वर स्वागत गीत सादर केले.

प्रमुख पाहुणे डॉ. विनोद भाले व सौ. रेखा भाले यांचा सत्कार शाल आणि पुष्पगुच्छ देऊन श्रीकांत पत्की, प्रमोद बेंडे, शैलजा देशपांडे यांच्या हस्ते करण्यात आला.



श्रीराम जोशी, चंद्रकांत कुलकर्णी, सौ. जयश्री प्रफुल्ल पांडे या निवडणूक समितीचा सत्कार शाल आणि पुष्पगुच्छ देऊन प्रमोद बेंडे, वंदना देशमुख यांनी केला.

निवडणूक निर्णय अधिकारी श्रीराम जोशी यांनी नवनिर्वाचित व्यवस्थापन मंडळातील सर्व सदस्यांना शपथ दिली. मावळते अध्यक्ष श्रीकांत पत्की यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष प्रमोद बेंडे यांना संस्थेचा कार्यभार सोपविला.

मावळत्या व्यवस्थापन मंडळातील अध्यक्ष श्रीकांत पत्की, उपाध्यक्ष शैलजा देशपांडे, सचिव प्रेमचंद तुल्ले, सहसचिव प्रफुल्ल पांडे, सदस्य इंदु अरोरा, सदस्य विनीता कलबुरगे यांचा सत्कार शाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

नवनिर्वाचित व्यवस्थापन मंडळातील सदस्यांचा सत्कार शाल आणि पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

प्रमोद बेंडे अध्यक्ष, वंदना देशमुख उपाध्यक्ष, कमलाकर पाठक सचिव,

प्रमोद सुरडकर सह सचिव, दिनेश जोशी कोषाध्यक्ष, देवेंद्र श्रीवास्तव सहकोषाध्यक्ष,

दत्तात्रय कुलकर्णी सदस्य, कल्पना सबनीस सदस्य, ज्योति पाटील सदस्य,

स्वीकृत सदस्य नेत्रा शंकरराव कुलकर्णी, शैला अरुण मोहनपूरकर, वसंत दत्तात्रय कुलकर्णी, विश्वास प्रल्हादराव काळे.

खालील मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

१ मावळते अध्यक्ष श्रीकांत पत्की यांनी मागील दोनवर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. सभासद संख्या ९०० आहे, ८० वर्षा पेक्षा जास्त वय असणारे ११५ सदस्य आहेत, मागील दोन वर्षात १६० कार्यक्रम घेतले व देश विदेशातील ५०,००० लोकांनी हे कार्यक्रम फेसबुक वर पहिले,

अनेक सहली काढल्या, असे ते म्हणाले. मागील दोन वर्षात सहकार्य केलेल्या सर्वांचे आभार त्यांनी व्यक्त केले. नवनिर्वाचित व्यवस्थापन मंडळातील सदस्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

२ नवे अध्यक्ष प्रमोद बेंडे मनोगतात म्हणाले, गुरुवर्य वि. वि. चिपळूणकर आणि माजी अध्यक्ष यांचा आदर्श समोर ठेऊन, संस्थेची प्रगती व सभासदांना आनंद देण्याचा प्रयत्न करेन,

३ प्रमुख पाहुणे डॉ. विनोद भाले यांनी जुन्या व्यवस्थापन मंडळाच्या मागील दोन वर्षाच्या कार्याचे कौतुक केले. व नवीन व्यवस्थापन मंडळास शुभेच्छा दिल्या.

विनीता कलबुरगे यांनी आभार प्रदर्शन व इंदु अरोरा यांनी पसायदान सादर केले व कार्यक्रमाची सांगता झाली. सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# "फिरुनी जन्मलो मी याच जन्मी" या विलक्षण व दैवी अनुभवावरील विस्तारित पुस्तकाचे आज प्रकाशन

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - (२ एप्रिल २०२६ श्री हनुमान जन्मोत्सव)

जगी असो कार्य कठीण किती अपार ।
तव कृपेने सहज होईल ते पार ।।


हनुमान चालीसातील वरील मराठी दोह्याशी समर्पक दोहा तुम्हाला नक्कीच आठवत असेल. हो माझ्याकडून प्रत्यक्ष हनुमानानीच हनुमान चालीसेचे हे मराठी हनुमान चाळीसा करुन घेतले व जेथे मी अडलो तो दोहा होता,

दुर्गम काज जगत के जेते। सुगम अनुग्रह तुम्हरे तेते।

त्यावेळेस मला हनुमानांच्या पायाचा आवाज आला व मला हे शब्द ऐकू आले. यावर विश्वास ठेवणे अवघड, पण हनुमान भक्तांस सहज शक्य.

असे बरेच चमत्कार माझ्या आयुष्यात घडले, सर्वात मोठा चमत्कार म्हणजे माझ्या दोन्ही किडन्यांची रिकव्हरी. हृदयविकाराच्या झटक्यानंतर २०११ मध्ये माझ्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या होत्या.

डॉक्टरांनी बरे होणे नाही असे सांगितले व कदाचित जन्मभर डायलिसीसवर रहावे लागेल असेही सांगितले. त्यावेळी मी व सर्वांनी हनुमानाची प्रार्थना, हनुमान चालीसाचा जप चालू ठेवला. हनुमानास तर मी माझ्या भक्तीची लाज राखून संजीवनी आणण्यास सांगितले. जवळ जवळ १० सिटींगनंतर दोन्ही किडन्या बऱ्या झाल्या. ३५ दिवस आयसीयू, ४ दिवस व्हेंटीलेटरवर, अशा अनेक दिव्यातून मी स्वामी समर्थ, साईबाबा, गजानन महाराज यांच्या कृपेने व प्रत्यक्ष हनुमानाच्या दर्शनाने पूर्णतः बरा झालो. मला सातत्याने




हनुमानाच्या कृपेचे अनुभव येत आहेत व आज ही हनुमान चाळीसा त्यांच्याच कृपेने सर्व भक्तांना समर्पित करतांना मला कृतकृत्य वाटत आहे.

आज माझ्या "फिरुनी जन्मलो मी याच जन्मी" या विलक्षण व दैवी अनुभवावरील विस्तारित पुस्तकाचे शानदार प्रकाशन हनुमान जन्मोत्सवच्या शुभ मुहूर्तावर होतं आहे. ज्योतिर्मय प्रकाशनने या पुस्तकाचे प्रकाशन केले आहे, या अनुभवातून अनेकांच्या आरोग्याचे रक्षण होऊ शकते म्हणून प्रत्येकाने नक्कीच वाचावे असे हे पुस्तक आहे या पुस्तकाची किंमत फक्त १२५ रुपये आहे तरी सर्वांनी या पुस्तकाचा लाभ घ्यावा असे ज्योतिर्मय प्रकाशनचे संजय व्यापारी यांनी सांगितले. पुस्तकासाठी संपर्क - श्री किशन वसेकर, छत्रपती संभाजीनगर मो. ७०२०८५४२५३.

# ...म्हणून निर्मित सावंत यांनी सुपर डुपरसाठी मकरंद अनासपुरेंची मदत घेतली

ज्योतिर्मय साहित्य



मराठी चित्रपटसृष्टीतील दमदार अभिनेत्री निर्मिती सावंत या पुन्हा एकदा त्यांच्या प्रभावी अभिनयाने प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेत आहेत. आगामी 'सुपर डुपर' या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये त्यांच्या तोंडी असलेला रांगडा लहेजा, संवादफेक आणि अस्सल गावाकडचा अंदाज प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरत आहे.

या चित्रपटात त्या गावातील एका खंबीर बाईची भूमिका साकारत आहेत. ट्रेलरमध्येच त्यांच्या व्यक्तिरेखेची झलक पाहायला मिळते. घर सांभाळणारी, परिस्थितीशी झुंज देणारी आणि कुटुंबाच्या अस्तित्वासाठी उभी राहाणारी स्त्री. विशेष म्हणजे, या भूमिकेला अधिक वास्तववादी बनवण्यासाठी निर्मिती सावंत यांनी खास मेहनत घेतली आहे.

ग्रामीण भाषेचा नेमका फ्लेवर, रांगडेपणा आणि बोलीभाषेतील बारकावे अचूक साधण्यासाठी त्यांनी मराठी सिनेसृष्टीत स्वतःची एक खास शैली निर्माण करणाऱ्या अभिनेता मकरंद अनासपुरे यांची मदत घेतली. त्यांनी स्क्रिप्ट पाठवून त्यांच्याकडून भाषेतील शब्द, वाक्प्रचार आणि लहेजा समजून घेतला, ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखेला खरेपणाची जोड मिळाली. याबद्दल निर्मिती सावंत म्हणतात, ट्रेलरमध्ये दिसतंच आहे की, मी एका गावाकडच्या बाईची भूमिका साकारतेय. तिचं आयुष्य, तिचं जगणं हे खूप वास्तव आहे.

भाषेचा आणि लहेजाचा अचूकपणा यासाठी मी मकरंद अनासपुरेशी संपर्क साधला. अर्थात दिग्दर्शकाच्या परवानगीने. मकरंद त्याच भागातला असल्यामुळे, त्याच्या मार्गदर्शनामुळे त्या बोलीचा रांगडेपणा आणि नैसर्गिकपणा मला समजला. तिथले काही शब्द कसे वापरले जातात , हे कळले. त्यामुळे ही भूमिका अधिक खरी वाटते. अशीच जर मी ती भूमिका साकारली असती तर माझ्या आणखी एक भूमिकेपैकीच ती राहिली असती, मात्र आता ती प्रेक्षकांपर्यंत पोहोचेल, असं मला वाटतं.''

चित्रपट निवडण्याबाबतही त्या अत्यंत विचारपूर्वक निर्णय घेतात. स्क्रिप्ट वाचताना त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात आणि त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळाल्यानंतरच त्या भूमिका स्वीकारतात. प्रॉडक्शन हाऊस, दिग्दर्शक, लेखक, डीओपी अशा सर्व गोष्टींचा बारकाईने विचार करूनच त्या चित्रपटाची निवड करतात. नव्या कलाकारांमध्येही 'स्पार्क' दिसला, तर त्यांच्यासोबत काम करण्यास त्या नेहमी तयार असतात. नवीन वर्षात विविध सुपरहिट चित्रपटांमधून वेगवेगळ्या, लक्षवेधी भूमिका साकारत निर्मिती सावंत यांनी आपली अभिनयाची छाप अधिक गडद केली आहे. 'सुपर डुपर'मधील त्यांची ही ग्रामीण भूमिका देखील प्रेक्षकांच्या मनात घर करेल, यात शंका नाही.

झी स्टुडिओजची प्रस्तुत, नाईंटी नाईन प्रॉडक्शन्स आणि सिद्धिविनायक प्रॉडक्शन्स निर्मित 'सुपर डुपर' हा कौटुंबिक मनोरंजनाचा महासोहळा येत्या ३ एप्रिल रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. समीर आशा पाटील दिग्दर्शित सुपर डुपर' या चित्रपटाचे विजय शिंदे आणि नरेश बोर्डे निर्माते आहेत. उमेश कुमार बन्सल, बवेश जानवलेकर प्रस्तुतकर्ता असून छायांकन संजय जाधव यांनी केले आहे.












## नव्या पुस्तकाचे स्वागत !

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : मराठी भाषेच्या प्रमाणलेखनाचा इतिहास, त्याची परंपरा आणि सखोल अभ्यास आणि प्रमाण लेखनविषयक विविध पैलू एका ठिकाणी मांडणारे 'मागोवा - मराठी भाषेच्या प्रमाणलेखनाचा इतिहास' हे महत्त्वपूर्ण पुस्तक आता वाचकांच्या भेटीला आले आहे.

मराठीतील ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली भाषा अभ्यासक डॉ. नागेश अंकुश यांच्या लेखणीतून साकारलेले हे पुस्तक मराठी लेखनाच्या अचूकतेचा जवळपास चारशे वर्षांचा प्रवास उलगडते. या पुस्तकाला ज्येष्ठ भाषातज्ज्ञ प्रा. यास्मिन शेख यांची दीर्घ प्रस्तावना आहे. शिक्षक, विद्यार्थी, संशोधक आणि मराठीप्रेमी यांच्यासाठी हे अनोखे पुस्तक निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

या पुस्तकाचे अनौपचारिक प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या निवासस्थानी पार पडले. यावेळी राजहंस प्रकाशनाचे श्री. दिलीप माजगावकर, सुप्रसिद्ध चित्रकार विकास गायतोंडे यांची उपस्थिती होती.



# ''जल्लोष कलागुणांचा'' तसेच वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न







**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर : श्री महात्मा बसवेश्वर प्री-प्रायमरी स्कूल'', पहाडसिंगपुरा, छत्रपती संभाजीनगर या शाळेचा ''जल्लोष कलागुणांचा'' तसेच ''द्वितीय वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ'' हा कार्यक्रम हॉटेल कृष्णा इन येथील सभागृहात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय डॉ. श्री ओमप्रकाशजी शेटे साहेब (अध्यक्ष, आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती, राज्यमंत्री दर्जा) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय श्री संजयजी केनेकर साहेब (आमदार, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य) होते.

कार्यक्रमास विशेष प्रमुख अतिथी म्हणून माननीय श्री समीरजी राजुरकर साहेब (महापौर, छत्रपती संभाजीनगर) उपस्थित होते. तसेच माननीय डॉ. श्री अमरनाथजी सोलपुरे सर (माजी प्रभारी कुलगुरू, आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तथा माजी अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर), माननीय प्रा. श्री रमेशजी आवटे सर (प्रदेशाध्यक्ष, वीरशैव लिंगायत सभा, महाराष्ट्र राज्य) आणि माननीय श्री सूर्यकांतजी कोकणे साहेब (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, क्राईम ब्रँच, पुणे) यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून मा. डॉ. रेणुका शिवलिंग आप्पा संभाहरे (नगरसेविका, नगरपरिषद, गेवराई), मा. सौ. कल्पना रामेश्वर आप्पा लांडगे (सचिव, श्री महात्मा बसवेश्वर प्री-प्रायमरी स्कूल, छत्रपती संभाजीनगर), माजी नगरसेवक श्री जगदीशजी सिद्ध तसेच भाजपा जिल्हा शहर चिटणीस श्री दीपकजी ढाकणे उपस्थित होते.

संस्थेचे मुख्य समन्वयक व कार्यक्रमाचे आयोजक श्री रामेश्वर लांडगे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर शाळेच्या प्राचार्या सौ. दिपाली देशमुख यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित असलेले श्री अशोक आप्पा फुलशंकर (जिल्हा संपर्कप्रमुख, शिवा संघटना, छत्रपती संभाजीनगर), डॉ. श्री संजयजी उबाळे (अध्यक्ष, लॉयन्स क्लब, राहता-शिर्डी), श्री विजय आप्पा शाहीर (प्रदेशाध्यक्ष, वीरशैव रुद्रभूमी समस्या निवारण समिती, महाराष्ट्र राज्य), श्री विलास आप्पा संभाहरे (शिवसेना नेते), श्री अमोलजी पाटणी (माजी राष्ट्रीय कोषाध्यक्ष, अखिल भारतीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ संघटना), श्री सय्यद बहावुद्दीन (राज्य कोषाध्यक्ष, अखिल भारतीय प्रयोगशाळा तंत्रज्ञ संघटना, महाराष्ट्र राज्य), श्री अविनाशजी धमगाये (राज्य कोषाध्यक्ष, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी संघटना, महाराष्ट्र राज्य), डॉ. नेक परवीन शेख मॅडम (सहप्राध्यापक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर), श्री सितारामजी विधाते (वैद्यकीय सामाजिक अधीक्षक, सिव्हिल हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर), तसेच शाळेचे कोषाध्यक्ष इंजि. श्री सोमेश्वर लांडगे उपस्थित होते.

याशिवाय गेवराई येथील प्रतिष्ठित व्यापारी श्री शिवलिंग आप्पा संभाहरे व श्री सुधाकर आप्पा संभाहरे, तसेच छत्रपती संभाजीनगर येथील बांधकाम व्यावसायिक श्री रविंद्रजी कुलकर्णी आणि सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमासाठी विविध वृत्तपत्रांचे संपादक, पत्रकार बांधव तसेच विविध चॅनेलचे प्रतिनिधी यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेच्या प्राचार्या सौ. दिपाली देशमुख, शिक्षिका अर्पिता मुळे, सौ. प्रतीक्षा चव्हाण तसेच श्री रितेश लांडगे, श्री आदित्य आहेर आणि श्री रोहित देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी बालकलाकारांच्या गायन व नृत्य सादरीकरणाचा मनमुराद आनंद घेतला.

सर्व मान्यवरांनी १२व्या शतकातील क्रांतीसूर्य, जगतज्योती श्री महात्मा बसवेश्वर यांनी स्थापन केलेल्या जगातील पहिल्या लोकशाही संसद ''अनुभव मंडप'' यांच्या कार्याची माहिती उपस्थितांना दिली. तसेच अशा महान समाजसुधारकांच्या नावाने छत्रपती संभाजीनगर येथे सुरू असलेल्या या शाळेतील विद्यार्थी निश्चितच प्रगती करून देशसेवेसाठी घडतील, अशी आशा व्यक्त करत सर्व विद्यार्थी व त्यांच्या पालकांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. यापैकी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करत शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेचे कोषाध्यक्ष इंजि. श्री सोमेश्वर लांडगे यांनी केले.

# हनुमान जन्मोत्सव : माहिती व महती

**ज्योतिर्मय साहित्य**



रामभक्त हनुमानाचा जन्म चैत्र पौर्णिमेला झाला असल्याने त्या दिवशी हनुमान जन्मोत्सव साजरा केला जातो. आज २ एप्रिल २०२६ रोजी हनुमान जन्मोत्सव आहे. हनुमानाचा जन्म पहाटे सुर्य उगवतांना झाला असल्याने उगवत्या सकाळी हनुमानाचा जन्मोत्सव सर्वत्र साजरा करण्यात येतो. या दिवशी पहाटे लवकर उठून स्नान करून मंदिरात जाऊन पूजा करतात.

हनुमानाला फुले, नारळ, सिंदूर आणि तेल अर्पण केले जाते. जन्मल्याबरोबर मारुतीने पहाटेच्या उगवत्या लालबुंद सूर्याला पकडण्यासाठी आकाशात झेप घेतली होती, आणि तेंव्हा सूर्याच्या उष्णतेमुळे त्याचे तोंड भाजले, त्यामुळे त्याचे तोंड लाल, काळे पडले अशी कथा सांगितली जाते. त्यामुळे टरबूज, खरबूज, नारळ फोडून नैवेद्य दाखवला जातो. कदाचित ही उन्हाळ्याची सुरुवात शांत, थंड व्हावी असा यामागील उद्देश असावा. नंतर पूजा, आरती भक्तिभावाने करून हनुमान स्तोत्रे, ''हनुमान चालीसा'' आणि ''सुंदरकांड'' यांचे पठण केले जाते.

अनेक ठिकाणी भजन, कीर्तन आणि मिरवणुका आयोजित केल्या जातात.

प्रसाद म्हणून बुंदी लाडू वाटले जातात. रामायण या महाकाव्यात त्यांनी भगवान श्रीराम यांची निः स्वार्थ सेवा केली.

हनुमान जयंती आपल्याला सांगते की खरी शक्ती ही नम्रतेत आणि भक्तीत असते. अडचणींवर मात करण्यासाठी आत्मविश्वास आणि श्रद्धा आवश्यक आहे.

हिंदू मान्यतेनुसार संकटमोचन हनुमानाचा जन्म भगवान विष्णूच्या राम अवताराच्या सहकार्यासाठी झाला होता. सीता आणि रावण यांच्यातील युद्धात हनुमानाने भगवान श्रीरामांना मदत केली होती. त्या अगोदर रामनवमी साजरी केली जाते. त्यानंतर हनुमान जन्मोत्सव साजरा केला जातो.

हनुमान जन्मोत्सव हा अंजनीच्या पुत्राचा म्हणजेच हनुमानाचा आशीर्वाद मिळविण्याचा सर्वोत्तम दिवस आहे. या दिवशी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. भक्त उपवास ठेवून हनुमानाची पूजा करतात. पंचांगानुसार या वर्षी हनुमान जन्मोत्सवला रवि योग तयार होत आहे. शास्त्रामध्ये हा योग कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी सर्वोत्तम मानला गेला आहे. सूर्याच्या विशेष प्रभावामुळे रवि योग हा प्रभावी योग मानला जातो. सूर्याच्या ऊर्जेमुळे या योगात केलेल्या कामात यश मिळते.

हनुमानाचा जन्म अंजनेरी पर्वतावर माता अंजनीच्या पोटी झाला. तो पवन म्हणजेच वायुदेवाचा पुत्र होता. म्हणूनच त्याला अंजनीसुत, वायुसूत, पवनपुत्र, बजरंगबली किंवा आंजनेय अशा अनेक नावानी ओळखतात.

तो जन्मापासूनच अत्यंत असामान्य ताकद

असलेला होता. लहानपणापासूनच त्याला अनेक शक्ती प्राप्त झाल्या होत्या. एकदा सुर्याकडे आकर्षीत होऊन त्याला गिळण्याकरता हनुमानाने सुर्याकडे कुच केले इंद्रदेवांसह सर्व देव भयभीत झाले इंद्रदेवाने सुर्याला आणि पृथ्वीला वाचवण्याकरता आपले वज्र हनुमानाकडे फेकले त्यामुळे हनुमंत मुर्च्छित झाले, त्यांनतर पवनदेवाने सर्व सृष्टीतील वायू ओढून घेतला त्यामुळे प्राण्याचं अस्तित्व धोक्यात आले त्यांनतर सर्व देवतांनी हनुमानाला त्या बेशुद्ध अवस्थेतुन बाहेर आणले, त्यांनतर पवन देव शांत होऊन सुरवातीसारखे वायू पर्यावरणात सोडले, तसेच तेव्हा हनुमानाला सर्व देवतांनी आशिर्वाद देत काही शक्ती प्रदान केल्या. एक दिवस खेळते वेळी हनुमानाने एका ऋषींचा परिहास केला त्यामुळे त्याला शाप दिला 'तुला तुझ्या सर्व शक्तींचा विसर पडेल'.

पुढे प्रभु श्रीरामचंद्र वनवासात असतांना त्यांची आणि हनुमंताची भेट झाली. हनुमानाने प्रभु रामचंद्राना वनवासात आणि युध्दादरम्यान फार मदत केली. हनुमंताच्या आणि वानरसेनेच्या बळावरच रामाने रावणाशी युध्द केले आणि जिंकले देखील. त्याला चिरंजीवत्व लाभलेले आहे. म्हणजेच त्याला कधीही मृत्यू नाही, तो अमर आहे. तो कायम सत्याच्या बाजूने उभा असतो. म्हणूनच तो महाभारताच्या काळात सुद्धा अगदी अर्जुनाचे सारथ्य करत असलेल्या श्रीकृष्णाच्या पक्षात असल्यामुळे त्याच्या रथावर असलेल्या भगव्या झेंड्यावर कायम होता. आणि म्हणूनच कौरव आणि पांडवांच्या युद्धत पांडवांचा विजय झाला.

हनुमानाला संजीवनी विद्याही प्राप्त होती. कोणत्याही असाध्य रोगांवर त्याच्या जपाने, नामस्मरणाने मात करता येते, अशी भविकांची श्रद्धा आहे. राम-रावण युद्धात जेंव्हा लक्ष्मण बेशुद्ध पडला, तेंव्हा मारुतीने औषधी वनस्पती




आणण्यासाठी चक्क आपल्या शक्तीने एका हातावर द्रोणागिरी पर्वत उचलून आणला होता आणि लक्ष्मणाचे प्राण वाचले. ही खरी स्वामीनिष्ठा!

युद्धात विजय मिळवून वनवास संपल्यावर अयोध्येत परत आल्यावर सीतामाईंनी त्याला बक्षीस म्हणून एक किंमती मोत्यांचा हार भेट दिला. तेंव्हा त्यांनी त्यात काहीच राम नाही, तर राम माझ्या हृदयात आहे असे सांगितले, आणि चक्क हृदयात, मनात जपलेल्या श्रीरामांची मूर्ती दाखवली

अशी असावी स्वामीनिष्ठा!

समर्थ रामदास स्वामी हे श्रीरामाचे, बजरंगबलीचे थोर उपासक होते. लोकांना शक्ती प्राप्त व्हावी, ताकद मिळावी, मनोबल उत्तम राहावे यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी हनुमान मंदिरांची स्थापना केली. आखाडे बांधून कुस्त्यांचे महत्व म्हणजेच ताकदीचे महत्व लोकांना पटवून दिले, व्यायामाचे महत्व पटवून दिले. जनजागृती केली. ही सर्व हनुमान मंदिरे सातारा जिल्ह्यात व आसपास आहेत. हल्ली बरेच लोक अकरा मारुती यात्राही करतात. हनुमान हे केवळ शक्तीचे प्रतीक नाही, तर ते भक्ती, निष्ठा आणि सेवाभावाचे मूर्तिमंत उदाहरण आहे. हनुमानाने आपल्या बुद्धी, धैर्य आणि पराक्रमाच्या जोरावर अनेक संकटांवर मात केली.

बेट द्वारका येथे भारतातील एकमेव असे हनुमान पुत्र मकरध्वज आणि हनुमान यांचे एकत्र असलेले मंदिर आहे. हनुमान तर ब्रह्मचारी होता ,मग त्याला पुत्र आहे हे ऐकुनच खरेरतर आश्चर्य वाटले होते . मग खुपच उत्सुकता वाढली तेंव्हा अशी माहिती समजली ,की हनुमानाच्या तीन पत्नी होत्या. पहिली सूर्यपुत्री सुवर्चला ,दुसरी वरुण पुत्री सत्यव्रती व तिसरी रावण दुहिता म्हणजेच चंद्रलेखा बहिणीची व खर दुषण यांची मुलगी राजकन्या अनंगकुसुमा.

सूर्यदेव हे मारुतीचे गुरु. त्यानी ६४ विद्या शिकवण्याचे कबुल केले होते. त्यापैकी ६० कला शिकवल्या. पण चार कला शिकण्यासाठी त्यांनी विवाहीत असणे आवश्यक आहे अशी अट घातली. अशावेळी ते आपली आजन्म ब्राह्मचऱ्यांची शपथ पण मोडू शकत नव्हते. त्यावेळी सूर्यदेवानी त्यांची पुत्री सध्या व्रतस्थ आहे, त्यामुळे तिच्याशी लग्न कर, म्हणजे तुझीही शपथ मोडणार नाही आणि लग्नाची अट पण पूर्ण होईल, त्यामुळे सगळ्या विद्या तुला प्राप्त होतील असा उपाय सुचवला. मग

त्यांच्या मुलीशी विवाह केल्यावरच सूर्यदेवांनी हनुमन्ताला शिक्षण दिले. शिक्षण संपेपर्यंत सुवर्चला उग्र तपश्चर्येला बसल्यामुळे ते ब्राह्मचारीच राहिले. नंतरही त्यांना विवाह करावा लागला पण त्यांचे मन रामसेवेत लीन असल्यामुळे ते ब्रह्मचारीच राहिले.

लंका दहन केल्यानंतर हनुमानाच्या अंगाचा प्रचंड दाह झाला होता. घामाने संपूर्ण शरीर डबडबले होते. अशावेळी दाह कमी व्हावा म्हणून समुद्रात पाण्यात शेपूट बुडवले त्यावेळी त्यांच्या घामाचा एक थेंब मगरीने गिळला. त्यामुळे ती गर्भवती राहिली. कालान्तराने पाताळपुरीचा राजा

अहिरावण यांच्या शिपायाने मगरीचे पोट कापले आणि मकरध्वजाचा जन्म झाला. मगरीच्या पोटातून जन्म झाला म्हणून त्याचे नावं मकरध्वज असे ठेवले. त्याला पाताळपुरीचा द्वारपाल केले. पुढे अहिरावण् याने राम व लक्ष्मणाला बंदी करून समूद्राच्या तळाशी असलेल्या पाताळपुरीत कैद केले होते. त्यांना सोडवण्यास हनुमंत जेंव्हा समूद्राच्या तळाशी गेला तेंव्हा मकरध्वजाने त्यांना अडवले. त्याच्याशी युद्ध करण्यास सुरुवात केली. आत्तापर्यंत हनुमंताना कोणीही हरवू शकले नव्हते, पण मकरध्वजाचे सामर्थ्य पाहून ते चकित झाले. तेंव्हा मगर सुंदर स्त्री वेशात समोर आली आणि तिने हा मकरध्वज तुमचा आणि माझा मुलगा असल्याचे सांगितले. हनुमंताना खूप राग आला, कारण ते तर ब्रह्मचारी होते. मग हे कसे शक्य होते. तेंव्हा तीने सर्व वृत्तांत सांगितला. मकरध्वजालाही वडिलांची ओळख सांगितली तेंव्हा त्यांला खूप आनंद झाला. त्याने वडिलांचा आशीर्वाद घेतला. पण तो पडला अहिरावणाचा द्वारपाल! त्यांच्यापाशी बेईमानी कसा करणार, मोठ्ठाच पेच होता. कारण जन्मदात्या वडिलांची आज्ञापालन करणेही तेवढेच महत्वाचे होते. शेवटी त्याने मारुतीला सांगितले की मला मोठ्या साखळदन्डाने बांधून बंदी बनवून अहिरावणा समोर घेऊन जा. मारुतीने तसे केले व अहिरावणाबरोबर युद्ध करून त्याचा वध केला आणि राम- लक्ष्मणाची सुटका केली. नंतर श्रीरामानी हनुमानपुत्र मकरध्वजाला पाताळ लोकीचा राजा बनवले. अशा पिता पुत्राचे एकमेव मंदिर इथे आहे आणि इथे मारुतीच्या हातात नेहमीप्रमाणे गदा नाही, तर मोठ्ठी दान्डी आहे. म्हणूनच याचे नाव ''दांडी हनुमान'' मंदिर असे आहे.

अशा अनेक हनुमानकथा खूपच श्रवणीय

आहेत, आपल्याला स्फूर्तीदायक आहेत. म्हणूनच हा हनुमानजयंतीचा उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. बोला.. ''बजरंगबली की जय!'' ***

# अस्थिर समाज आणि भोंदूगिरी !

**ज्योतिर्मय साहित्य**



ऐसे कैसे झाले भोंदू
कर्म करुनी म्हणती साधू
अंगी लावूनिया राख
डोळे झाकूनी करिती पाप
दाऊनी वैराग्याची कळा
भोगी विषयाचा सोहळा
तुका म्हणे सांगू किती
जळो तयाची संगती

सोळाव्या शतकातील तुकारामाने लिहिलेल्या अभंगाची प्रचिती २१व्या शतकात पावलोपावली येत आहे. समाजात वाढलेली अस्थिरता, विकृती, स्वैराचार, अनैतिकता समाजातील भोंदूगिरीला खतपाणी घालताना दिसत आहे. अरे आपण ज्यांना देव मानतो ते राम, कृष्ण आणखीन असे देवाचे कित्येक अवतार भूतलावावर जन्म घेताना देव म्हणून नव्हे, तर माणूस म्हणून जन्माला आले आणि ह्या पृथ्वीवरील सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन केले. सांगायचेच झाले तर त्यांनाही त्यांच्या जीवनकाळात चढ उतार, कष्ट, दुःख, विरह यासारख्या गोष्टी अनुभवल्या, भोगल्या पण त्यांनी कधीही मी देव आहे मी गंडे दोरे, चमत्कार करून ह्या सगळ्यातून झटक्यात बाहेर पडेल असे मनातही आणले नाही. त्यांनी भूलोकी जन्म घेऊन जन्म मरणाचे चक्र व्यवस्थित पाळले. अगदी सांगायचेच झाले तर कुरुक्षेत्रातील युद्धात प्रत्यक्ष श्रीकृष्ण सारथी होते, पण त्यांनी कधीच चमत्काराची भाषा वापरली नाही. त्यांनी केवळ सत्य आणि असत्य, नैतिकता आणि अनैतिकता, या गोष्टी अर्जुनाला सांगितल्या. सत्य हेच एकमेव अद्वितीय आहे हे त्यांनी पटवून दिले. संताने देखील भक्ती केली, पण त्यांनी निर्गुण निराकार शक्ती पाहिली. त्यांनी निसर्गातील प्रत्येक गोष्टीत देव पाहिला. वृक्षवल्ली, पशुपक्षी सर्वांमध्ये त्यांना देव दिसला. संतांनी व्यवहारी भक्ती कधीच केली नाही. त्यांनी कधीच देवाकडे काही मागितले नाही किंवा कधी काही दिलेही नाही, ते निर्विकार भक्ती करत राहिले. त्यांनी नेहमी विश्वाचे हित मागितले, परमानंद मागितला. हीच ती भक्ती.... हेच ते प्रेम.... पण आजकाल भक्ती, प्रेम, देव, मंदिरे सगळीकडेच व्यवहार पहायला मिळू लागला. देव आणि भक्तांमध्ये एजंट वाढले. देवाणघेवाणीचे व्यवहार राजरोषपणे चालू लागले. त्यातच भर म्हणून की काय काहीजण स्वतःला स्वयं घोषित देवही म्हणू लागले.जर या दैवी शक्ती भूतलावर माणूस म्हणून वावरत होते तर या पाखंडी लोकांना इतके धाडस येते कुठून? माझ्याकडे दैवी शक्ती आहे..... त्या शक्तीने मी तुमचे भले करेन .....कल्याण करेन..... अरे लाजा वाटल्या पाहिजेत त्यांच्याकडे जाणाऱ्या अंध भक्तांना. आपल्याकडे राम कृष्ण यांचा इतिहास आहे. तुकाराम, ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्ताबाई, जनाबाई यांच्यासारखी संत परंपरा आहे. त्यांनी कधीही भोंदूगिरीचे समर्थन केले नाही उलट वेळोवेळी त्यावर स्पष्ट शब्दात टीका केली आहे. संतांनी कधीच चमत्काराचा दावा केला नाही. त्यांनी कधीच माया जमवली नाही. ते कधीच विषय वासनेत अडकले नाहीत, म्हणून ते मनुष्य असूनही दैवत्वाला पोहोचले. गेल्या काही वर्षापासून अनेक भोंदू महाराज स्वतःला देव म्हणून घेत नानाविध गोष्टी करताना पकडले गेले. आसाराम बापू, राम रहीम यांपासून अलीकडे चर्चेत असलेला कॅप्टन खरात, ऋषिकेश वैद्य, पुण्यातील ॲपवाला बाबा हे सगळे वासनेत गर्त पाखंडी. हे काय आपले भविष्य सांगणार. या सगळ्या लोकांकडे जाणारे शिक्षित अंधभक्त, कॅप्टन खरात कडे तर मंत्री, संत्री, आमदार, खासदार, उच्चभ्र घरातील स्त्रिया, शासकीय सेवेतील कर्मचारी यांची उठ बस. आपले लोकप्रतिनिधी हे आपल्या समाजाचे नेतृत्व करत असतात, ते आपल्या समाजाचा आरसा असतात .समाजाचा मोरक्या, वाटाड्या असतात. समाज त्यांचे अनुकरण करत असते आणि हेच लोक जादूटोणा, बुवाबाजी यामध्ये गुरफटलेले आहेत .आणि या लोकांना आपण आदर्श म्हणायचे......! यांच्याकडून विकासाची अपेक्षा करायची....! ,हे कितपत योग्य आहे. यांचा स्वतःचा माणूस म्हणून विकास अजून झालेला नाही हे सिद्ध होते.या घटनेत असलेल्या महिला कदाचित काही पद,पैसा, प्रतिष्ठा, प्रसिद्धी च्या हव्यासापोटी अडकल्या गेल्या असतील पण या घटनेची दुसरी बाजू देखील महत्त्वाची आहे... काही महिला खरोखरच अडचणीत असतील अस्वस्थ असतील त्या अंधपणे बाबावर विश्वास ठेवून त्याच्याकडे गेल्या असतील. आणि या बाबांनी त्यांच्या परिस्थितीचा गैरफायदा घेऊन आपल्या वासनेच्या शिकारी बनवल्या असतील. विश्वासात घेऊन विश्वासघात करणारी लोक समाजात विषारी सापासारखे वावरत असतात त्यांना ओळखणे कठीण झाले आहे. पण या सगळ्यात स्त्रीची होणारी बदनामी याला जबाबदार कुठेतरी नकळत आपणच आहोत. नैतिकता, माणूसकी बाजूला ठेवून समाजात निर्माण झालेली अस्थिरता, अराजकता थांबवायला हवी. घराघरात माणुसकीची शिकवण द्यायला हवे.आपण माणूस आहोत माणसासारखे जगूयात. देव अथवा दैत्य होण्याचा कोणीही प्रयत्न करू नये.



अर्चना हिंगलजकर,
शिरवळ, 9225527464

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559